७।१९

जा. क्र. कामगार/अ/ ३७६२२
म.रा.वि. वितरण कंपनी मर्या.,
कामगार औद्योगिक संबंध विभाग
४था मजला, प्रकाशगड,बांद्रा (पू), मुंबई.
दिनांक : १०/१०/२००७

# परिपत्रक

विषय : कर्मचा-यांचे प्रलंबित प्रश्न / गा-हाणे सोडविण्याबाबत.

****************

कर्मचा-यांचे प्रश्न अथवा गा-हाणे सोडविण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यालयाकडून यापूर्वी अनेक परिपत्रके निर्गमित करुन कामगार संघटनांबरोबर नियतकालीन (Periodical) तक्रार निवारण बैठका आयोजित करुन कर्मचा-यांचे प्रश्न, समस्या सोडविण्याबाबत निर्देश दिले आहेत. परंतु नुकतेच कामगार संघटनांबरोबर झालेल्या बैठकीत काही संघटनांनी असे निदर्शनास आणून दिले की, क्षेत्रीय कार्यालयात कामगार संघटनांबरोबर मुख्य कार्यालयाच्या निर्देशानुसार कामगार तक्रार निवारण बैठका नियमितपणे न झाल्यामुळे कर्मचा-यांचे प्रश्न प्रलंबित राहतात. तसेच प्रश्नांबाबत निर्णय होऊन देखील त्याची अंमलबजावणी वेळीच होत नाही त्यामुळेही कर्मचा-यांमध्ये असंतोष निर्माण होतो व त्याची परिणीती सामुहिकपणे अथवा वैयक्तिकरित्या धरणे आंदोलन, काम बंद, असहकार अथवा उपोषण इत्यादीसारख्या कृतींमध्ये होते. पर्यायाने याचा परिणाम औद्योगिक शांततेवर होऊन कंपनीच्या दैनंदिन कामकाजावर त्याचा विपरित परिणाम होतो. सबब, वीज ग्राहकांना सुरळीत सेवा देण्यामध्ये अनेक अडथळे येतात व जनमानसात कंपनीबद्दलची प्रतिमा डागाळली जाते.

याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, कर्मचारी / कामगार संघटनांचे त्या-त्या पातळीवरील प्रलंबित प्रश्न अथवा गा-हाण्यांचा निपटारा वेळच्या वेळी करावा व मुख्य कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील निर्देशांन्वये कामगार संघटनांबरोबर परिमंडळ, मंडल व विभागीय स्तरावर कामगार तक्रार निवारण बैठका आयोजित कराव्यात. तसेच अशा बैठकीत कामगार प्रश्नांच्या अनुषंगाने घेतलेल्या निर्णयाची वेळीच अंमलबजावणी करावी जेणे करुन कर्मचारी अथवा कामगार संघटनांकडून प्रश्न / गा-हाण्यांची सोडवणूक करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे आंदोलन होणार नाही.

व्यवस्थापकीय संचालक (महावितरण)

प्रती :
कार्यकारी अभियंता पातळीपर्यंत.

E:\Backup Of Meena\D Drive\Jt. clro pardeshi\prashan garane.doc